



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १९७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# मराठीला ज्ञान भाषेत रूपांतरित करून पुढील पिढीपर्यंत नेऊया – मुख्यमंत्री

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विधान भवनात ‘जावे विनोदाच्या गावा’ विशेष कार्यक्रम



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**मुंबई, दि. २७ :** जगामध्ये ज्ञानभाषा असलेल्या भाषांच पुढे प्रवाहित होत असल्याचा इतिहास आहे. ज्या भाषेतून व्यवहार चालतो, रोजगार मिळतो, ती भाषा प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे आपल्या अभिजात मराठी भाषेला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध अशी मराठी भाषा आपण पुढील पिढीपर्यंत नेऊया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित ‘जावे विनोदाच्या गावा’ या विशेष कार्यक्रमात व्यक्त केला.

कार्यक्रमास व्यासपीठावर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे, विधिमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्या काळात मराठी भाषा शुद्ध होण्यासाठी शब्दकोश तयार केला. त्यावेळी प्रशासन चालविताना मराठीवर फारशी, अरबी या भाषांचे आक्रमण होते. त्यामुळे मराठी भाषेचे शुद्धीकरण करण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराज यांनी केले. मराठी भाषेचा अभिमान हा सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून सुरू होतो. सुरुवातीच्या काळातील आद्य ग्रंथांमधून आपली मराठी भाषा किती अभिजात आहे, हे आपल्याला पाहायला मिळते.

मराठी भाषेला समृद्ध करायचे असेल, पुढे न्यायचे असेल तर तंत्रज्ञान, संशोधने ही मराठी भाषेतूनच झाली पाहिजेत. तेव्हा मराठी ही ज्ञानभाषा होईल, असा विश्वास विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केला.

मराठी माणसाच्या रक्तातच विनोद आहे. विनोद हा समाजामध्ये माणूस जोडणारा पूल आहे. त्यामुळे संकटातही जो विनोद शोधतो, तोच खरा मराठी माणूस आहे, अशा शब्दात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी माणसाचा गौरव केला.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आचार्य अत्रे आणि पु. ल. देशपांडे ही मराठी भाषेतील विनोदाची दोन शिखरे आहेत. त्यांच्या कर्तुत्वाची उंची हिमालयाएवढी आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिला आहे. त्यामुळे मराठी भाषा समृद्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. मराठीचा वापर सर्व क्षेत्रात व्यवहाराची भाषा म्हणून केला पाहिजे. मराठीच्या समृद्धीची पताका सातासमुद्रापार आपल्याला फडकवत ठेवायची आहे. मराठी भाषेने मागील काळात बरेचसे बदल आत्मसात केले आहेत.

तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना डिजिटल माध्यमांमध्ये मराठीचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे. प्रत्येक डिजिटल माध्यमांचा उपयोग करताना मराठीचा उपयोग करीत अधिक सक्षमपणे पुढील पिढीपर्यंत समृद्ध मराठीचा वारसा नेण्यात यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री सुनिता पवार म्हणाल्या, लंडनमध्ये मराठी व महाराष्ट्राच्या संस्कृतीचे केंद्र ठरणाऱ्या प्रस्तावित महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी मागील काळात पाच कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. मराठी भाषेच्या प्रचारासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदानही वाढवून देण्यात आले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे समस्त मराठी जन आनंदित झाले आहेत. हा मराठी भाषेचा खूप मोठा गौरव आहे. मराठी भाषा ही अर्थाजनाची भाषा होण्यासाठी हा दर्जा निश्चितच महत्त्वाचा ठरणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करीत मराठी साहित्याची महती विशद केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे यांनी केले.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावणार – वनमंत्री गणेश नाईक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२७, मुंबई :** बोरिवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा पर्यावरणीय समतोल राखत आणि आदिवासी व पात्र रहिवाशांना न्याय देत पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल. महिन्याभरात ठोस निर्णय घेऊन प्रक्रिया गतिमान करण्यात येईल, अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली.

बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील आदिवासी पाडे व अतिक्रमित झोपडपट्टी धारकांच्या पुनर्वसना संदर्भात सदस्य सुनील प्रभू यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेला उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी यासंदर्भात लवकरच ठोस निर्णय घेऊन पुनर्वसन प्रक्रिया गतिमान करण्यात येईल, असे सांगितले. सात हजार रुपये अनामत भरलेल्या पात्र कुटुंबांना घरे देण्यासाठी स्वतंत्र योजना राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वनमंत्री नाईक म्हणाले की, अतिक्रमित झोपडपट्टीतील ७ हजार रुपये भरलेल्या पात्र झोपडपट्टी धारकांसाठी खासगी ३० एकर जागेवर टीडीआरच्या माध्यमातून पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच उद्यानातील मूळ रहिवाशांचे ९० एकर जागेवर ‘ग्राउंड प्लस वन’ स्वरूपातील बांधकाम करून पुनर्वसन करण्याची शासनाची तयारी आहे. आरे कॉलनी परिसरातील उपलब्ध जागेबाबत झोनल मास्टर प्लॅन तयार केला जात असून महिन्याभरात निर्णय होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत सर्व लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन विषय निकाली काढण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

उद्यानातील आतील पाड्यांना सुविधा देण्यास न्यायालयाने नेमलेल्या समितीने मनाई केली आहे. मात्र उद्यानाबाहेरील वस्तींसाठी, उद्यानातून गेलेल्या पाणीपुरवठा पाइपलाइनच्या दुरुस्तीला मान्यता दिली जाईल, असे वनमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## लोकनेते दि.बा.पाटील यांचं विमानतळाला नाव द्यावे

### सरकारला दिबांच्या नावाची ॲलर्जी?



**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**

**दि. २७, कागल-कोल्हापूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्र सरकार यांची नक्की अडचण काय आहे हेच समजत नाही. ३ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा.पाटील यांचेच नाव दिले जाईल, अशी ग्वाही लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीला दिली. काही तांत्रिक अडचणींमुळे याला तीन महिने लागतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. आता तीन महिने झालेच शिवाय त्यावर आणखी दोन महिने झालेत, तरीही केंद्र सरकार विमानतळाचे नामांतर करायला तयार नाही. यामुळे नवी मुंबईसह ठाणे, रायगड आणि मुंबईतील आगरी समाज संतप्त झाला आहे. या पार्श्वभूमीवर २३ फेब्रुवारी रोजी कृती समितीने मुंबईच्या आझाद मैदानात लक्षवेधी धरणे आंदोलन करत सरकारला इशारा दिला आहे. या आंदोलनाची ना सरकारने दखल घेतली ना माध्यमांनी, हीच गंभीर बाब आहे. वास्तविक नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी दशकभरापासून होत आहे. मात्र, त्याकडे कुणी गांभीर्याने पाहात नव्हते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव विमानतळाला देण्याचे प्रयत्न होते. मात्र, लोकमागणीमुळे त्यांनीही सरकार जाता जाता दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. ही घटना जून २०२२ मधील. तेव्हापासून पावणेचार वर्षे भाजप-शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीचे सरकार आहे. मग दिबांच्या नावाचे गाडे अडले कुठे, असा सवाल विचारला जात आहे.

राज्यात आणि केंद्रात एकच सरकार असून पावणेचार वर्षे दिबांच्या नावाच्या प्रस्तावाचा विचार केला जात नसेल तर या सरकारला कोणत्या अर्थाने गतिशील सरकार म्हणायचे? आझाद मैदानावरील धरणे आंदोलनात सर्वपक्षीय कृती समितीने सरकारला एक आठवड्याची मुदत दिली आहे. तोपर्यंत सरकारने विमानतळाचे नामकरण न केल्यास हातात दगड घेऊन लाखोंच्या संख्येने मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. या निमित्ताने दिबांचेच नाव विमानतळाला हवे, या मागणीवर कृती समिती आग्रही असल्याचे स्पष्ट झाले.

## मनपा शाळेचे विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर चमकले पाहिजेत – प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२७, मुंबई :** शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रामध्ये सुद्धा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांचे नाव चमकले पाहिजे.अशी अपेक्षा जी /दक्षिण विभागाच्या शासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांनी व्यक्त केली. त्या आज दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी विभागीय अंतिम वार्षिक क्रीडा स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. त्यांच्यासोबत जी/दक्षिण विभागातील विभाग निरीक्षक सुरेश घिगे व शारीरिक शिक्षण विभागाचे कनिष्ठ पर्यवेक्षक अनिल मोरे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळेच्या इमारत प्रमुख सुजाता तडवी यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना वर्षा गांगुर्डे म्हणाल्या की जी/दक्षिण विभागातील शारीरिक शिक्षण विभागाचे सर्व शिक्षक मेहनती असून त्यांनी आतापर्यंत क्रीडा क्षेत्रामध्ये अनेक खेळांमध्ये जिल्हा विभाग व राज्यस्तरा पर्यंत विद्यार्थ्यांना पोहचवून उत्तम कामगिरी केलेलीच आहे.परंतु त्याही पुढे जाऊन विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या खेळामध्ये सातत्य ठेवून आपल्या आवडीच्या खेळात जिल्हाच नव्हे तर थेट राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारून आपला नावलौकिक करावा.आणि आपले व आपल्या आई-वडिलांचे,गुरुजनांचे आणि मुंबई महानगरपालिकेचे नाव रोशन करावे.असे आवाहनही प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांनी केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सन २०२५ -२६ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम दिनांक २० फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी या कालावधीत पार पडला.जी/दक्षिण विभागात एकूण सहा संकुले करण्यात आली होती.प्रत्येक संकुलामध्ये आठ ते नऊ शाळांचा सहभाग होता.

## पारनेर तालुक्यातील अवैध वाळू तस्करीचा प्रश्न विधानसभेच्या पटलावर

### आ.दाते यांनी विधिमंडळात उठवला विविध प्रश्नांवर आवाज



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** आमदार काशिनाथ दाते यांनी सुरू असलेल्या अधिवेशनात पारनेर तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि वाळू तस्करांच्या मुजोरीतून वाढत चाललेल्या अपघातांच्या घटनांचा गंभीर मुद्दा सभागृहात उपस्थित केला.

आ. दाते यांनी याबाबत लक्ष वेधताना सांगितले की, तालुक्यातील काही नदी पात्रांमधून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असून ओव्हरलोड ट्रक व डंपर वेगाने धावत असल्याने रस्ते धोकादायक बनले आहेत. अशाच एका पारनेर तालुक्यातील बोकनकवाडी ते वासुंदा रोडवर घडलेल्या अपघाताच्या घटनेत भरधाव डंपरने संतोष नऱ्हे नावाच्या दुचाकीस्वारास धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर चालकाने सबंधित जखमी तरुणास मदत न करता रस्त्यावरच डंपरमधील वाळू खाली करून पसार झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळल्याचे ही त्यांनी सभागृहात नमूद केले. या अपघातामुळे केवळ एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला नाही, तर अवैध वाळू वाहतुकीचा धोका किती भीषण आहे.

**▶ अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी विशेष पथके कार्यरत आहेत. काही प्रकरणांत गुन्हे दाखल करून वाहनांवर दंडात्मक कारवाई व जप्ती करण्यात येऊन कडक कारवाई करण्यात येतील. अपघात प्रकरणी ही तपास सुरू असून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, कोणालाही सोडलं जाणार नाही.**

**– चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

## कोरा सातबारा परत मिळावा

### बाळगंगा प्रकल्पग्रस्तांचे प्रांत कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२७, पेण (रायगड) :** बाळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आजपासून प्रांत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे. कोरा झालेला सातबारा मूळ मालकांच्या नावे परत मिळावा या प्रमुख मागणीसाठी शेतकऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. या या आंदोलनास काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भेट देऊन व काँग्रेस पक्षाचा जाहीर पाठिंबा देण्यात आला. यावेळी बाल गंगा प्रकल्पग्रस्तांचा विषय विधिमंडळ कामकाजात व संसदीय पटलावर उपस्थित करण्यात येईल असे यावेळी सपकाळ यांनी स्पष्ट केले व आंदोलकांना धीर दिला.

सकाळी ११ वाजता उपविभागीय (प्रांत) कार्यालयासमोर प्रकल्पग्रस्त शेतकरी एकत्र जमले आणि घोषणाबाजी करत बेमुदत उपोषण करून शासनाचे लक्ष वेधले आहे. प्रशासनाला यापूर्वी सुद्धा निवेदन देण्यात आले होते. मात्र मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी उपोषणाचा निर्णय घेतला आहे. या उपोषणाला महाराष्ट्र राज्य काँग्रेस कमिटी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शेकाप महाराष्ट्र राज्य खजिनदार अतुल म्हात्रे, पेण तालुका अध्यक्ष अशोक मोकळं, महासचिव संघटक काँग्रेस नंदा म्हात्रे, श्रुती म्हात्रे, महिला जिल्हा उपाध्यक्ष काँग्रेस राणी अग्रवाल, यांनी उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शवला आहे.

बाळगंगा धरण प्रकल्पासाठी सन २०१० पासून जमिनी संपादित करण्यात आल्या.आहेत जवळपास ८० टक्के काम पूर्ण झाले आहे या प्रकल्पामुळे पेण तालुक्यातील नऊ गावे व तेरा आदिवासी वाड्यांतील सुमारे ३,८०० हून अधिक कुटुंबे बाधित झाली आहेत. एकूण १,२४० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली होती. ‘न्याय्य नुकसानभरपाई व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३’ मधील कलम १०१ नुसार, पाच वर्षांत वापरात न आणलेली संपादित जमीन मूळ मालकांना परत देण्याची तरतूद आहे.

अक्षराज



# राष्ट्रीय विज्ञान दिन !





संपूर्ण देशात आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते थोर भारतीय शास्त्रज्ञ डॉ सी व्ही रामन यांनी रामन इफेक्ट हा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जगासमोर सादर केला. त्या दिवसाचे औचित्य साधून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतात शास्त्रीय, शैक्षणिक, वैद्यकीय, तांत्रिक, संशोधन आणि सर्व विद्यालये, महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था तसेच शास्त्रज्ञ, संशोधक हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतात. भारतासाठी पहिले नोबेल पुरस्कार मिळवून देणारे थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ.सी.व्ही. रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी भौतिक शास्त्रातील अत्यंत्य महत्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकिरणासंबंधी संशोधन करून त्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर केला. त्यांच्या या शोधनिबंधाला १९३० साली मान्यता मिळाली आणि त्याच वर्षी या संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सी व्ही रामन हे नोबेल पुरस्कार मिळवणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ ठरले. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजे १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो.

डॉ.सी.व्ही. रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी चेन्नई (पूर्वीचे नाव – मद्रास ) येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर व्यंकट रामन असे होते. शालेय वयातच रामन हे अत्यंत्य तल्लख बुद्धीचे होते. रामन यांनी वयाच्या ११ व्या वर्षीच शालेय शिक्षण पूर्ण केले. १५ व्या वर्षी ते गणित आणि विज्ञान या विषयाचे पदवीधर झाले. वयाच्या १७ व्या वर्षी सी व्ही रामन यांनी भौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण मद्रास येथे उच्च श्रेणीत पूर्ण केले. त्यानंतर ते कोलकाता येथे डेप्युटी अकाउंटट जनरल या पदावर रुजू झाले पण या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी कोलकाता येथे कमी पगारात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून अध्यापन करीत असताना त्यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले.

१९२१ मध्ये कोलकाता विद्यापीठाने त्यांना उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठवले. तिथे त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीमध्ये तंतुवाद्ये हा शोधनिबंध सादर केला. पुढे १९३५ मध्ये भारतीय तंतुवाद्ये विशेष करून तबल्याची नादनिर्मिती, तबल्याची पुडी, शाई, तरंगलांबी इत्यादींवर संशोधन केले. युरोपातून समुद्रामार्गे भारतात येत असताना आकाशातील निळा रंग पाहून त्यांना या रंगाविषयी कुतुहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचेच का असते? असा प्रश्न त्यांना पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी पाणी, बर्फ यांमधून प्रकाशाचे होणारे विकिरण यावर संशोधन केले. या संशोधनातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाचे उत्तर मिळाले. रामन इफेक्ट म्हणजे प्रकाशाचे विकिरणच.

प्रकाशाचे विकिरण हा एक दृश्य परिणाम आहे. अशा प्रकारांचे किरण जेव्हा आपल्या डोळ्यात शिरतात, तेंव्हाच आपल्याला प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव होते. रामन हे सुरवातीला स्फटिकांच्या अणू रचनेसंबंधी आढळणाऱ्या रचना साधर्माशी अपवादात्मक असा अभ्यास करत होते. या दरम्यान १९२८ साली त्यांना असे आढळून आले की विकिरत प्रकाशामध्ये मूळ प्रकाशाइतक्या तरंग लांबीच्या किरणांबरोबर इतरही प्रकाश किरणांचे अस्तित्व असते. ज्यांचा मागमूसही मूळ प्रकाश किराणांमध्ये नव्हता. या नवीन किरणांचा जास्त अचूक अभ्यास करण्यासाठी त्यांनी पाऱ्याच्या विद्युतदीपघटापासून मिळणारी तरंग लांबी अभ्यासली आणि त्यातून त्यांच्या नवीन निष्कर्षाला, संशोधनाला बळकटी मिळाली. प्रकाशामध्ये कण स्वरूपाशी साधर्म्य सांगणारे काही गुणधर्म असतात. त्यांच्या प्रकाश कानीकांमधील ऊर्जा ही त्या प्रकाशाच्या कंपन संख्येच्या समप्रमाणात असते. त्यांचा हाच शोधनिबंध रामन इफेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांच्या या अत्यंत्य मौलिक आणि अनमोल अशा संशोधनामुळे पुढे अनेक शोध लागले. भौतिक शास्त्रात सध्या जे शोध लागत आहे त्याचे मूळ याच रामन इफेक्ट मध्ये सामावलेले असते. रामन इफेक्टमुळे माहितीचे भंडार खुले झाले. त्यामुळेच देशातील १७ विद्यापीठांनी तसेच जगातील ८ विद्यापीठांनी त्यांना सन्माननीय डॉक्टरेट फेलोशिप बहाल केली. १९४३ मध्ये रामन यांनी बंगलोर येथे रामन संशोधन संस्थेची स्थापना केली. या संस्थेत भौतिक शास्त्रातील संशोधनाला अग्रक्रम देण्यात आला. १९५४ साली भारत सरकारने त्यांचा भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरव केला. १९५७ साली आंतरराष्ट्रीय लेनिन पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. आपण लावलेल्या शोधाचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हायला हवा. विध्वसंक कार्यासाठी त्याचा उपयोग व्हायला नको असे त्यांचे मत होते. १२ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या सर्व भारतीयांना मनापासून शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार**

# माणसं ओळखायला शिका!



**– किशोर जाधव**
**सोलापूर**
**मो.९९२२८८२५४१**

लेखाचे शीर्षक सुचताच मला तो लिहिण्याची उत्सुकता वाटली. याचप्रमाणे, ज्याला हा लेख वाचण्याची संधी मिळेल तोही हे शीर्षक पाहून लेख पूर्ण वाचण्याची नक्कीच उत्सुकता दाखवेल. कारण आपल्या संपर्कात येणारी माणसं चांगली की वाईट, दृष्ट की सूष्ट, न्यायप्रिय की अन्यायखोर, सत्यवान की लबाड, विश्वासू की विश्वासघातकी, बुद्धिमान की निर्बुद्ध, चलाख की मंदबुद्धी, कावेबाज की सरळमार्गी–अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याची इच्छा प्रत्येकाच्या मनात असते. चला, या प्रश्नांचा विचार करूया.

खरं तर माणसं ओळखणं हे एखादं वर्तमानपत्र किंवा पुस्तक वाचण्याइतकं सोपं नाही. अक्षरांपासून शब्द, शब्दांपासून वाक्य आणि वाक्यांमधून अर्थ तयार होतो. कधी तो सरळ असतो, तर कधी गर्भित अर्थ दडलेला असतो. परंतु माणसाचं वाचन तितकं सरळ नसतं. कोणत्याही व्यक्तीची खरी ओळख अनुभवातूनच होते.

मानसशास्त्रज्ञांनी वर्तनशास्त्राच्या अभ्यासातून विविध सिद्धांत मांडले आहेत. मात्र सामान्य माणसाने माणसं ओळखण्यासाठी सजग आणि डोळस दृष्टी ठेवणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीच्या वर्तनाचा पॅटर्न समजून घेणे, तिच्याशी आलेल्या अनुभवांचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, आपण एखाद्या दुकानातून नियमित खरेदी करत असू, तर त्या दुकानदाराच्या स्वभावाचा अंदाज आपल्याला येतो. तो प्रामाणिक आहे की बेरका, हे त्याच्या बोलण्यावरून आणि वागण्यावरून लक्षात येते. त्यानुसार तो दर्जेदार वस्तू ठेवतो की भेसळयुक्त, हेही हळूहळू स्पष्ट होते.

**कोणताही माणूस शरीर आणि मन यांचा मिलाफ असतो. त्यामुळे माणसं ओळखताना पुढील तीन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत :**

**१) अबोध मन** – सिग्मंड फ्राईड यांनी ‘अबोध मन’ ही संकल्पना मांडली. त्यांच्या मते बालपणातील अनुभव अबोध मनात साठतात आणि व्यक्तिमत्त्व घडवतात. म्हणून एखाद्या व्यक्तीला समजून घ्यायचे असेल, तर त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी, संस्कार, मित्रपरिवार आणि पूर्वानुभव जाणून घेणे आवश्यक आहे.

**२) पर्यावरणातील उद्दीपके** – वर्तनवादाचे जनक जॉन वॉटसन यांनी वर्तनालाच व्यक्तिमत्त्व समजून घेण्याचा पाया मानला. त्यांच्या मते, ज्या वर्तनाचे परिणाम अनुकूल असतात ते वर्तन माणूस पुन्हा पुन्हा करतो; प्रतिकूल परिणाम देणारे वर्तन टाळतो. त्यामुळे एखादी व्यक्ती चुकीच्या मार्गाने यश मिळवत असेल, तर तिला तेच योग्य वाटू लागते.

**३) व्यक्तीचे स्वतःचे अनुभव** – व्यक्ती स्वतःच्या अनुभवांतून स्वतःची विचारसरणी घडवतो. ती पुरोगामी आहे की अधोगामी, व्यवहारिक आहे की संधीसाधू–हे तिच्या बोलण्या–वागण्यातून स्पष्ट होते. शितावरून भाताची परीक्षा या म्हणीप्रमाणे, पहिल्या भेटीतच निरीक्षणाची सवय लावली पाहिजे. उदाहरणार्थ, कॅन्टीनमध्ये भेट झाल्यावर एखाद्याने चहाचे बिल देण्याची तयारी दाखवली, तर त्याच्या स्वभावाचा एक पैलू समोर येतो.

ज्यांना जनसंपर्काचे काम करावे लागते–जसे की लोकप्रतिनिधी, वकील, पोलीस–त्यांना माणसं ओळखणं अत्यावश्यक असतं. अनुभवातून ते भेटणाऱ्या माणसांच्या व्यक्तिमत्त्वाचा अंदाज पटकन बांधतात. व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्तीप्रमाणे प्रत्येक व्यक्ती वेगळी असते, हे लक्षात ठेवणेही महत्त्वाचे आहे.

जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर केवळ संधी ओळखून चालत नाही; माणसंही ओळखावी लागतात. सजग निरीक्षण, अनुभवांचे चिंतन आणि वस्तुनिष्ठ विचार यांच्या आधारावरच आपण योग्य माणसांची निवड करू शकतो. कारण योग्य माणसं हीच यशाची खरी शिडी असते. त्याचबरोबर माणसं ओळखत ओळखत, योग्य माणूस बनण्याचा प्रयत्न केला तर समाज आपोआप सुंदर होईल.

## ज्ञानोबा परिवर्तनवादी विद्यावाचस्पती तू...

प्रिय ज्ञानोबा...
रंजलेल्या, गांजलेल्या, पिचलेल्या, प्रतिकूल परिस्थितीचा
परिवर्तनवादी क्रांतीदूत तू,
ज्ञानोबा वैचारिक परिवर्तनाचा ज्ञानदीप तू।।०१।।
संत वाङ्मयाचा निरूपणरुपी संस्थापक तू,गळ्यात तुळशीमाळा हातात भगवी
पताका असा नित्य नियमरुपी जगणाऱ्या वारकरी संप्रदायाचा आरंभ तू।।०२।।
कुजलेल्या मेंदूवाल्यांच्या विकृती मुळापासून उखाडून टाकणारा क्रांतिदूत तू,
कर्मठ आणि कर्मभ्रष्ट अशा अनिष्ठ परंपरा नाकारणारा कर्मयोगी तू ।।०३।।
अज्ञान अंधःकारात सामाजिक,मानसिक,बौद्धिक गुलामीच्या छायेत
असणाऱ्या महाराष्ट्र देशातल्या माणसांच्या प्रबोधनासाठी ज्ञानेश्वरी लिहिणारा
क्रांतिकारी लेखक तू,अनिष्ट रूढी,अंधश्रद्धेचे उच्चाटन करणारा माणसातील
देव तू ।।०४।।
अध्यात्माला मानवतेची जोड देणारा सामर्थ्यशाली साकव तू,
शुद्ध नीती आणि चारित्र्यातूनचं समाजभान टिकेल असं ठासून सांगणारा
मूल्य शिक्षक तू ।।०५।।
भल्या भल्या स्वयंघोषित पंडिताना परिवर्तनातून डोळस बनविणारा
विद्यावाचस्पती तू, लोकांना मृत्यूचा अर्थ समजवून सांगण्यासाठी ‘देह’
म्हणजे सर्वस्व नसून ‘आत्मा’ अमर आहे, अशी शिकवण देत समाधीचा
मार्ग निवडणारा तपस्वी, आशावादी तू ।।०६।।
माझा मराठाची बोलू कौतुके!परी अमृतातेही पैजा जिंके असा भाषेतूनी
समता, सहिष्णुता आणि ऐक्याचा महामेरू तू ।।०७।।
मोराच्या अंगी असोसे।पिसे अहाती डोळसे।परी एकली दिठी नसे तैसे ते
गा।।
अशा मूल्यविचारांतून डोळ्यावर पट्टी बांधलेल्यांचे डोळे उघडणारा क्रांतिसूर्य
तू,
मनपरिवर्तन एका क्षणात होणार नाही त्यासाठी सातत्य लागते अशा
वैचारिक पेरणीचा शेतकरी तू ।।०८।।
दिंडी हा केवळ पायी प्रवास नव्हे,
तो एक चित्तशुद्धी आणि आत्मविकासाचा राजमार्ग हा सोप्या शब्दात
सांगणारा क्रांतिदूत तू ।।०९।।
मानवी मूल्यांची पायमल्ली अहंकारातचं ही मौलिक समाज शिकवण
शिकवणारा प्रबोधक तू,
भोंदू,समाज शोषण करणाऱ्या, मानसिक गुलामीत अडकवणाऱ्यांचा
कर्दनकाळ असा संत पंगतीतला कैवल्यऋषी तू ।।१०।।

**कवी – प्रा. अमीर मुमताज सलीम इनामदार**
**मु.पो. लोणंद, जि. सातारा**
**मोबा. :– ९८३४६७३४१८**

# विज्ञानवादी होणे काळाची गरज...

२८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून भारतात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भारत सरकारने भारताचे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या स्मरणार्थ दरवर्षी भारतात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्याची परंपरा सुरू केली आहे. यावर्षीही आपण हा दिवस साजरा करत आहोत. खरेतर मानवी जीवनाच्या विकासात व मानवाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी विज्ञान कटीबद्ध आहे.विज्ञानाच्या जोरावर आणि शास्त्रज्ञांच्या संशोधनामुळे मानवी जीवन अतिशय सुखकर आणि गतिमान झाले आहे.आजच्या आधुनिक काळात विज्ञानाशिवाय मानवी जीवन अपूर्ण आहे.जर मानवी जीवनातून विज्ञानाला अलगद बाजूला केले तर माणूस एकदम निष्क्रिय होऊन जाईल.

आजच्या काळात सगळी माणसे विज्ञानाचा पुरेपूर वापर करून घेतात. पण अंधश्रद्धेला चिकटून राहतात. खेदाची बाब अशी की सुशिक्षित माणसेच अंधश्रद्धेला खतपाणी घालतात. पदोपदी अंधश्रद्धा बाळगतात. भानामती, भुताटकी, हातचलाखी, गंडेदोरे, चारचाकी वाहनात लिंबू मिरची बांधणे, बाहेरवसा, आसरा, देवी अंगात येणे, देवी कोपणे अशा खुळ्या समजुतीच्या अंधश्रद्धा आजही समाजात, गावात आणि लोकांच्या मनात खंबीरपणे पाय रोवून उभ्या आहेत. आजच्या



घडीला प्रत्येकाकडे लेटेस्ट आणि ऑनड्रॉइड मोबाईल आहेत. मोबाईल हे विज्ञानाने शोधलेले असे यंत्र आहे ज्याने संपूर्ण मानवजातीला हॅक केले आहे.लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांना मोबाईलने मोहित केले आहे.असे असले तरीही माणूस अगदी बिनधास्तपणे अंधश्रद्धेला जपत असतो.एकीकडे विज्ञाचे गोडवे गायले जातात आणि दुसरीकडे अंधश्रद्धेची मनोभावे पूजा केली जाते. हा दुटप्पीपणा काय कामाचा?

एकीकडे आपण भारतीय लोक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अनेक यंत्रांच्या सहाय्याने दैनंदिन जीवन सुखाने व आनंदाने जगतो. औद्योगिक,आरोग्य,कृषी,सिंचन, क्रीडा,दळणवळण या क्षेत्रांबरोबर इतरही क्षेत्रांत विज्ञानाने क्रांती केली आहे.हे जग अतिशय वेगवान आणि आकर्षक झाले आहे.अनेक महान शास्त्रज्ञांनी संशोधन करून मानवी जीवनात क्रांतीकारी बदल घडवून आणले आहेत. एडीसने बल्बचा शोध लावला आणि मानवी जीवनातील अंधार नाहीसा झाला. वेगवेगळ्या आजारांवर प्रभावी औषधे विज्ञानाने शोधली आणि मानवाचे आयुर्मान वाढले.कृषी संशोधनामुळे आज हरितक्रांती घडून आली आहे. त्यामुळे कृषी उत्पादन वाढले आहे. आता तर कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजे एआयने

तर कमालच केली आहे.

सी.व्ही.रमण यांनी रामण इफेक्ट चा शोध लावला आणि जगातील थोर शास्त्रज्ञांमध्ये त्यांना स्थान मिळाले.त्यांच्या संशोधनाने भारताचे व त्यांचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचले.त्यांच्या सन्मानासाठी भारतात २८ फेब्रुवारी या दिवशी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करताना आपण विज्ञान तंत्रज्ञान आणि शास्त्रज्ञांचे तोंडभरून कौतुक करतो. त्याच दिवशी अनावधानाने अंधश्रद्धा ही बाळगतो. कर्मकांडाला विशेष महत्त्व देतो. मुहुर्त पाहिल्याशिवाय कोणतेही शुभकार्य केले जात नाहीत. हे सगळं बंद करून विज्ञानाचा मानवतेसाठी उपयोग करून घेतला पाहिजे. अंधश्रध्देला मुठमाती देऊन सापेक्ष व विज्ञानवादी जीवन जगण्याची शिकवण आत्मसात केली पाहिजे.म्हणून विज्ञानाची कास धरूया.विज्ञानवादी होणे काळाची गरज बनली आहे.

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर**
**जि.लातूर. मो.९७३०९३९७३२.**

## मराठी ..

मराठी वापरा साठी
कैकदा झाली युक्ती
प्रबोधन लाड पुरवी
कृतीशील नये उक्ती

सहजसुंदर ही भाषा
तरी का ना आसक्ती
स्वागतार्ह निर्णय हो
अनिवार्य असे सक्ती

अन्य भाषा भगिनीचं
हो त्यांची जरुभक्ती
समस्त भाषा मिळूनि
खरी अद्वितीय शक्ती

माझी माय मराठीचं
अधिराज्य मन तख्ती
आवडे सहजते सर्वां
विनाकरता ती सख्ती

मातृभाषा महत्त्वपूर्ण
असते नस ती दुखती
आईचे दुसरे सुस्वरुप
भाषा नसते गं नुसती

अधिकभाषा शिकूया
वृध्दींगत होई संपत्ती
द्वेष भाषा भाषांतला
आणेआगळी आपत्ती

भाषेची मुकुट मणी रे
मातृभाषाअत्यासक्ती
अंतरात उजळेज्योती
कृतीत आणता उक्ती

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वेध अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# दीक्षा कोरडे शास्त्रीय विभागात अव्वल ढोकेश्वर महाविद्यालयाच्या वतीने सत्कार




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** दिनांक २५ फेब्रुवारी २०१९ रोजी श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि कलागुणांना प्रोत्साहन देणारा हा सोहळा आनंदोत्सवाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून चित्रपट अभिनेते व कवी बाबासाहेब सौदागर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबत कला, क्रीडा व सामाजिक जाणीव जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे विश्वस्त सितारामजी खिलारी सर होते. प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य प्रा. वीरेंद्र धनशेट्टी, सांस्कृतिक विभाग प्रमुख कोठावळे, प्रा. अनुराधा गायके, प्रा.शीलवंत, डॉ. घुले (सूत्रसंचालन), प्रा. वीरेंद्र धनशेट्टी (आभार प्रदर्शन), शांता गडगे, नामदेव वाल्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी दीक्षा कोरडे हिने शास्त्रीय विभागात प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाचा मान उंचावला. सध्या ती एलएलबीचे शिक्षण घेत असून कायद्याचे सखोल ज्ञान आत्मसात करत आहे. तिचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेष म्हणजे दीक्षा कोरडे या पत्रकार संतोष कोरडे यांच्या सुनबाई असून त्यांच्या कुटुंबासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन उत्कृष्ट पद्धतीने पार पडले. एकूणच वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा उत्साह, आनंद आणि गौरवाने अविस्मरणीय ठरला.

# अवकाळी पावसामुळे पिकांचे अतोनात नुकसान; तातडीने पंचनामे करण्याची मागणी - डॉ. प्रतापसिंह पाटील

**अक्षराज : विकास वाघ**



**दि.२७, धाराशिव :** जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून झालेल्या अवकाळी पावसामुळे रबी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. काढणीच्या टप्प्यात असलेल्या गहू, ज्वारी, हरभरा तसेच कांदा व विविध फळबागांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे.

जिल्ह्यातील अनेक भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस झाल्याने शेतात काढून वाळत टाकलेला हरभरा पाण्यात भिजला आहे. त्यामुळे दाण्यांची गुणवत्ता खालावण्याची शक्यता निर्माण झाली असून बाजारभावावरही त्याचा विपरीत परिणाम होणार आहे. ज्वारीच्या कणसात पाणी शिरल्याने ती काळी पडण्याचा धोका निर्माण झाला आहे, तर गव्हाच्या उभ्या पिकालाही फटका बसला आहे. कांद्याच्या काढणीदरम्यान शेतात पाणी साचल्याने उत्पादनाचे नुकसान झाले आहे.

सध्या जिल्ह्यात रबी पिकांच्या काढणीचा हंगाम सुरू असून शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पिके जोपासली होती. मात्र अवकाळी पावसामुळे हातातोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची वेळ आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक फटक्याला सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून तलाठी व कृषी विभागामार्फत पंचनामे करावेत, तसेच बाधित शेतकऱ्यांना त्वरित व योग्य नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे. शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने मदत जाहीर करून आर्थिक आधार द्यावा, अन्यथा शेतकरी मोठ्या अडचणीत सापडेल, असेही त्यांनी नमूद केले.

# वाचन संस्कृती टिकविण्यासाठी नवीन ग्रंथालयांना अनुदान द्या

## खा. धानोरकरांची राज्य सरकारकडे आग्रही मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि. २७ चंद्रपूर :** आजच्या डिजीटल युगात आणि सोशल मिडीयाच्या वाढत्या प्रभावामुळे नवीन पिढीमध्ये वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. ही संस्कृती पुन्हा जिवंत करण्यासाठी आणि तरुणांना ज्ञानाकडे वळविण्यासाठी राज्यात नवीन ग्रंथालये स्थापन करण्यास सरकारने प्रोत्साहन दिले पाहिजे. यासाठी आगामी अर्थसंकल्पात नवीन ग्रंथालयाच्या अनुदानासाठी विशेष तरतूद करण्यात यावी, अशी लोकहितकारी मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

खा. प्रतिभा धानोरकर यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, कोणत्याही प्रगत समाजाच्या वैचारिक जडणघडणीत ग्रंथालयांचा वाटा मोलाचा असतो. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून राज्यात नवीन ग्रंथालयांच्या नोंदणीवर आणि त्यांना मिळणाऱ्या अनुदानावर अघोषित बंदी घालण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण भागातील वाचक आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. ज्या जुन्या संस्थांना अनुदान मिळत होते, त्यापैकी अनेक ग्रंथालये तांत्रिक अडचणींमुळे किंवा निधीअभावी बंद पडली आहेत. ही अत्यंत खेदाची बाब आहे. या गंभीर समस्येकडे राज्य सरकारचे लक्ष वेधताना खा. प्रतिभा धानोरकर यांनी मागणी केली की, 'सरकारने केवळ जुन्या ग्रंथालयांचे प्रश्न न सोडविता नवीन पिढीसाठी अद्यावत ग्रंथालये सुरु करण्याकरीता प्रोत्साहन दिले पाहिजे.

बंद पडलेल्या ग्रंथालयाचे थकीत अनुदान त्वरित वितरित करावे आणि नवीन ग्रंथालयांना शासनाच्या अनुदान यादीत समाविष्ट करण्यासाठी या अर्थसंकल्पात विशेष निधीची तरतूद करावी. 'राज्यातील वाचन चळवळ अधिक मजबूत झाल्यास सुसंस्कृत समाज घडण्यास मदत होईल', असा विश्वास व्यक्त करत खा. प्रतिभा धानोरकर यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करण्याची विनंती राज्य सरकारला केली आहे.

# कुलगुरु डॉ. खर्चे यांचे हस्ते बांधकामाचे भूमिपूजन संपन्न

**अक्षराज : प्रमोद डफळ**



**दि.२७, राहुरी (अहिल्यानगर) :** मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे प्रस्तावीत असलेल्या पाडेगाव ऊस संशोधन केंद्राची नवीन प्रशासकीय इमारत, शेतकरी प्रशिक्षण इमारत तथा अतिथीगृह आणि कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विद्यापीठ अभियंता मिलिंद डोके, संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की पाडेगाव ऊस संशोधन केंद्र सन २०३२ मध्ये शताब्दी वर्ष पूर्ण करणार आहे. पाडेगाव ऊस संशोधन केंद्राच्या आतापर्यंतच्या गौरवशाली संशोधन कार्याची शासन स्तरावर नोंद घेवून सदरचे संशोधन केंद्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे होण्यासाठी आवश्यक असणार्या प्रयोगशाळा तसेच प्रक्षेत्रावर विविध सुविधा, केंद्रावर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी कर्मचारी निवासस्थान तसेच केंद्राला भेट देण्यासाठी येणाऱ्या कृषि अधिकारी, ऊस कारखान्यांचे अधिकारी व शेतकरी यांची राहण्याची व्यवस्था, प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रासाठी भरीव निधी शासनाने उपलब्ध करून दिला. मागील ९३ वर्षापासून या संशोधन केंद्राने अधिक उत्पन्न आणि साखर उतारा देणारे १७ सुधारीत वाण प्रसारीत केलेले असून अर्थिकदृष्ट्या किफायतशीर ऊस लागवड तंत्रज्ञानासंबंधी ११० शिफारशी दिल्या आहेत. राज्यात ऊस लागवडीखालील असलेल्या एकूण ७५ टक्के क्षेत्रावर या संशोधन केंद्राने प्रसारीत केलेल्या फुले २६५ आणि को ८६०३२ या दोन वाणाखाली क्षेत्र असून त्यामधून राज्यातील ऊस उत्पादक शेतकर्यांना रू.१,००,७८७ कोटीचा निव्वळ नफा मिळालेला आहे. एकंदरीत महाराष्ट्रातील ऊस शेती व त्यावर आधारीत साखर उद्योग यांच्या भरभराटीत या संशोधन केंद्राने मोठे योगदान दिले आहे.

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांचे सहकार्याने हा निधी उपलब्ध झाला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे व पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तथा सेवा प्रवेश मंडळाचे अध्यक्ष श्री. तुषार पवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, कृषिच्या उपसचिव श्रीमती प्रतिभा पाटील यांचे सहकार्य आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, माजी संशोधन संचालक, डॉ. विठ्ठल शिर्के यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# संत निरंकारी मिशनचे विशाल स्वच्छता अभियान उत्साहात

## रायगडमध्ये एकाच वेळी २२ ठिकाणी जल स्वच्छता मोहीम

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, महाड (रायगड) :** पाणी हे निसर्गाचे अमूल्य वरदान आहे. जीवनाचा मूलाधार आणि मानवसभ्यतेची जीवनरेखा असलेले हे जल स्वच्छ व संरक्षित राहिले, तर केवळ पर्यावरणच नव्हे, तर मानवसमाजाचे एकूण आरोग्य आणि संतुलन अधिक सक्षम होते. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन रविवारी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत, सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी राबविण्यात आले. या अभियाना अंतर्गत रायगड जिल्ह्यातील नद्यांसह शहरातील विविध तलाव, विहीरी अशा एकूण २२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली.



रायगड जिल्ह्यामध्ये खोपोली, सावरोली, मार्केवाडी, तिवरे, पेण, बोर्वे, रोहा, कोंडगाव, अलिबाग, पोयनाड, सारळ, भिलजी, खरसई, भरडखोल, श्रीवर्धन, वडवली, खरवली, कडापे, चोरवली, महाड, बिरवाडी तसेच रावतळी या ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. महाड तालुक्यातील नडगाव तर्फे बिरवाडी येथील सावित्री आणि काळ नदी संगमच्या परिसरात तसेच केतकीचा कोंड (भवानी नगर) वाळण बु. येथील विहीरीसह परिसरामध्ये आणि पारदुलेवाडी येथे तलावाच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

'स्वच्छ जल, स्वच्छ मन' अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे भव्य व प्रेरणादायी आयोजन सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमित जी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमधील १ हजार ६०० हून अधिक ठिकाणी यशस्वीपणे पार पडले.

# कृषी तंत्र निकेतन खंडाळाचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२७, खंडाळा (सातारा) :** खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा संचलित रामचंद्र धोंडिबा खंडागळे कृषी तंत्र निकेतन खंडाळा ता.खंडाळा जि.सातारा या विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन, कृषी विज्ञान प्रदर्शन व पारितोषिक वितरण नुकतेच अत्यंत उत्साहात पार पडले. या समारंभाचे प्रमुख पाहुणे शिवाजी कुपते ऑपरेटिंग मॅनेजर टी.ई.कनेक्टिव्हिटी प्रा. लि. इंडिया, ऋषिकेश गुमास्ते परचेस मॅनेजर टी. ई. प्रा. लि.इंडिया व श्रीकृष्ण सपकाळ मॅनेजर मेंटेनन्स टी. ई. कनेक्टिव्हिटी प्रा. ली. इंडिया तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिरुद्ध दादा गाढवे सचिव खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा, सुरेश पवार उपाध्यक्ष खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा, बळवंत खंडागळे सभापती शाळा समिती, वसंतराव पंडित, धनंजय फाटक, सावंत एस.आर.संचालक खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा, सागर खारगे प्राचार्य कृषी तंत्र विद्यालय बोरगाव, जालिंदर माने प्राचार्य कृषि तंत्र निकेतन फलटण इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी प्रथम विज्ञान कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांचे हस्ते सरस्वती पूजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर कृषी तंत्र निकेतनचे प्राचार्य धर्मेंद्रकुमार माने सर यांनी उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थी पालक यांचे स्वागत करून या कृषी तंत्र निकेतनच्या स्थापना आणि आजपर्यंतचा इतिहास याबाबत माहिती दिली. या कृषी तंत्र निकेतन मधून शिक्षण घेऊन आजवर अनेक यशस्वी विद्यार्थ्यांनी विविध शासकीय तसेच खासगी क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवीत महाविद्यालयाचा लौकिक वाढवला असून अनेक विद्यार्थी कृषि व्यवसायात यशस्वी ठरले असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुणे ऋषिकेश गुमास्ते यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना आपली संगत जर चांगली असेल तर एखादा सर्वसामान्य विद्यार्थी देखील अभ्यासात सातत्य राखत यशस्वी भविष्य घडवू शकतो. तर संस्थेचे उपाध्यक्ष पवार स.बी. यांनी विद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक यांचे कौतुक केले.

तसेच संस्थेचे सचिव अनिरुद्ध दादा गाढवे यांनी रामचंद्र धोंडिबा खंडागळे (बापू) यांनी या कृषी तंत्र निकेतन साठी आपल्या संस्थेस जमीन दिल्यामुळेच आजची ही विद्यालयाची वास्तू उभी राहिली असून गेल्या काही वर्षात शेकडो विद्यार्थी या कृषी तंत्र निकेतन मध्ये शिकून यशस्वी जीवन जगत आहेत. श्री.सावंत यांनी विद्यार्थ्यांना जीवन जगत असताना ते कसे जगावे या विषयी मार्गदर्शन केले. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या विशेष प्राविन्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा यावेळी मान्यवरांचे हस्ते पार पडला. बक्षीस पारितोषिक वितरण वेळी विद्यार्थ्यांसह पालकांना देखील मंचावर आमंत्रित करण्यात आल्याने विध्यार्थी आणि पालक दोघांचा आनंद द्विगुणित झाल्याचे पाहायला मिळाले. यानंतर विविध गुणदर्शन कार्यक्रमात रामचंद्र धोंडिबा खंडागळे कृषी तंत्र निकेतनच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कला, गाणी, कविता, नाटक आदींचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

जवळपास तीन ते चार तास चाललेल्या या कला गुण दर्शन सोहळ्यात अत्यंत सुंदर नृत्यकला, अभिनय करत तिन्ही वर्ष विध्यार्थी उपस्थितांना खुर्चीला खिळवून ठेवण्यात यशस्वी ठरले. तसेच यावेळी खास विध्यार्थी शिक्षक यांचे आग्रहाखातर कृषी तंत्र निकेतन चे प्राध्यापक संकपाळ सर यांनी देखील यावेळी नृत्य सादर करत या कार्यक्रमात रंगत भरली. तसेच प्रथम व तृतीय वर्षातील विद्यार्थिनींनी बाबाची कहाणी या गाण्यावर उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांमध्ये भावनिकतेचे वातावरण तयार केले अतिशय उत्कृष्ट सादरीकरणामुळे पूर्ण विद्यालयाच्या वातावरणात सर्व उपस्थितांचे डोळे पाणावलेले होते.

अक्षराज



# पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे जुन्या मार्गानेच धावणार?

## तीव्र विरोधानंतर तोडगा काढण्याची घोषणा



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२७, मुंबई :** पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मार्ग अहिल्यानगर-शिर्डीमार्गे नेण्यासाठी सर्व स्तरांतून तीव्र विरोध होत असल्याने पुन्हा जुन्या मार्गानेच पुणे-नाशिक रेल्वे विकसित करता येईल का, याचा अभ्यास करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी जाहीर केले. नारायणगाव येथील 'जायन्ट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कॉप'च्या संरक्षित क्षेत्राला (बफर झोन) धोका निर्माण होणार नाही आणि जुन्या मार्गावरील महत्त्वाची गावे निसटणार नाहीत, अशा पद्धतीने तज्ज्ञ सल्लागारांकडून त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेऊ, असे आश्वासन फडणवीस यांनी विधान परिषदेत दिले.

**रेल्वे मंत्रालय आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला घेण्यासाठी आग्रह धरणार...**
**सल्लागारांकडून ३ ते ४ महिन्यांच्या कालावधीत पुणे-नाशिक रेल्वेमार्गासाठी योग्य मार्ग कोणता, याचा अहवाल घेणार**
**वेधशाळेचे नियम पाळून आणि प्रस्तावित मूळ रेल्वेमार्गात फार बदल न करता (डेव्हिएशन) सर्व गावे रेल्वेशी 'कनेक्ट' होण्याच्या दृष्टीने अभ्यासाअंती निर्णय घेणार**
**शिर्डीमार्गे गेल्यास प्रवासाचा वेळ किमान ३० मिनिटांनी वाढणार आहे.**
**जुन्या प्रस्तावित मार्गावरील संगमनेर, सिन्नर, नारायणगाव, चाकण यासारखी महत्त्वाची ठिकाणे रेल्वे नकाशावरून बाद होतील.**
**मार्ग बदलण्यास स्थानिकांचा तीव्र विरोध असून गावोगावी कृती समित्या,आणि विविध गावचे ग्रामस्थ सतत आंदोलने होत आहेत.**

विधान परिषदेतील आमदार सत्यजित तांबे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना फडणवीस यांनी या प्रकल्पातील अडचणी स्पष्ट केल्या; तसेच राज्य सरकारची भूमिका तुमच्यापेक्षा वेगळी नाही, अशी ग्वाही देतानाच, रेल्वेमंत्र्यांशी चर्चा करून तीन ते चार महिन्यांत सल्लागारांकडून योग्य मार्ग कसा काढता येईल, यासाठी प्रयत्न करण्याचे स्पष्ट केले. पुणे-नाशिक रेल्वे मार्ग हा नाशिक-सिन्नर-संगमनेर-अकोले-नारायणगाव-मंचर-चाकण या भागातून प्रस्तावित होता. मात्र, नारायणगाव परिसरात ३२ देशांच्या सहभागातून चालणारी जागतिक स्तरावरील 'जीएमआरटी' वेधशाळा आहे. रेल्वेच्या लहरींमुळे या वेधशाळेच्या कामात अडथळा येऊ शकतो, असे सांगून केंद्र सरकारने या मार्गाला लेखी नकार दिला आहे. केंद्र सरकारची भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात स्पष्ट करून पर्यायी मार्गाचाच विचार करावा लागेल, असे सांगितले.

# थोडक्यात

## सुस्मिता देशमुख ८ वेळा ठरली महाराष्ट्राची सीनियर सर्वोत्कृष्ट महिला पॉवरलिफ्टिंग पटू

**अक्षराज : जे.के.पोळ**




**दि.२७, ठाणे :** ज्ञानेश्वर विद्यालय वडाळा, येथे महाराष्ट्र राज्य क्लासिक सीनियर, मास्टर १,२,३,४ पॉवर लिफ्टिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत २०० पेक्षा जास्त स्पर्धकांना सहभाग घेतला होता. या स्पर्धेत ठाण्याच्या खेळाडू कुमारी-सुस्मिता सुनील देशमुख हिने ५२ किलो वजनी गटात ३८० किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले तसेच स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट बहुमान मानला जाणारा सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू २०२६ पटकाविले सलग ८ वर्ष महाराष्ट्राची सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार पटकाविले आहेत. तसेच ३१ जानेवारी २०२६ रोजी श्री कृष्ण खामकर विद्यालय, येथे ठाणे जिल्हा स्तरीय क्लासिक पॉवर लिफ्टिंग स्पर्धा संपन्न झाली होती. त्या स्पर्धेत सुस्मिता सुनील देशमुख हिला सुवर्णपदक तसेच सलग ९ वर्ष सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू ठाणे जिल्हा २०२६ मिळवत जोरदार कामगिरी केली. ठाण्याच्या रिओ फिटनेस व्यायाम शाळेत सराव करते तसेच प्रशिक्षण किरण देवीदास सनस, स्वप्निल पाटील यांच्या मदतीने या स्पर्धेत यश मिळविले.

# पाटणला ३ दिवस महोत्सवात मनोरंजनाच्या कार्यक्रमांची मांदियाळी




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२७, पाटण (सातारा) :** पाटण महोत्सवात पाटणला तिन.दिवस करमनुकीच्या कार्यक्रमांचाही तडखा 'खेळ पैठणीसह, जगदंब फोक अख्यान व सामुहिक डान्स सादरीकरणासह सिनेअभीनेत्री कल्याणी नंदकिशोर सह सिनेअभिनेते समृद्धीबाबा जाधव यांचा 'हसण्यासाठी जन्म आपला' अशा नानाविध कार्यक्रमाचा पाटण तालुका वासियाना लाभ मिळणार.

कोयना एज्युकेशन सोसायटी व रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२८ फेब्रुवारी ते २ मार्च पर्यंत पाटणला 'पाटण महोत्सव' या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या महोत्सवात भव्य प्रदर्शन व विक्री व मनोरंजनाच्या कार्यक्रमाचाही समावेश करणेत आला आहे.

बाळासाहेब देसाई हॉटेल मॅनेजमेंट कॉलेजच्या प्रांगणात या महोत्सवाचे संयोजन करणेत आले आहे. दरम्यान या महोत्सवात कृषी प्रदर्शनासह इतर संसार उपयोगी साहित्य व खाद्यपदार्थासह पुस्तकांचेही स्टॉल पहावयास मिळणार आहेत यात विविध महिला बचत गटांचेही खाद्यपदार्थ व वस्तुचे स्टॉल उभारले जाणार आहेत.

### पाटण महोत्सवात मनोंरजनाच्या कार्यक्रमांची मांदियाळी

महोत्सवात खास पाटण वासियांसाठी मनोरंजनाचा केंद्रबिंदू असलेल्या विविध करनमुकीच्या कार्यक्रमांचाही सहभाग करणेत आला आहे. दि.१ मार्च रोजी सकाळी ११ वाजता लागिर झाल फेम कल्याणी नंदकिशोर यांचा महिलांसाठी 'खेळ पैठणीचा' सायंकाळी ४ वाजता स्वरसह्याद्री ग्रुपचा संगित मैफिल व सायंकाळी ६ वाजता संगित लोकधारा प्रस्तुत लोकगितांवर अधाररित 'दि जगदंब फोक अख्यान' हा कार्यक्रम होणार आहे. दि. २ मार्च रोजी सकाळी ११ वाजता सामुहिक डान्स सादरीकरण हा लावणी कथक या नृत्यप्रकारावर आधारीत कार्यक्रम. व सायंकाळी ६ वाजता सिनेअभिनेते समृद्धी जाधव यांचा 'हसण्यासाठी जन्म आपला' हा बहारदार कार्यक्रम पहावयास मिळणार आहे.

# कळव्यात तब्बल १२३ किलो गांजा जप्त

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२७, कळवा (ठाणे) :** कारमधून गांजा विक्रीसाठी आलेल्या नाशिक येथील सागर पवार (वय ३३) आणि धोंडीराम चैत्य भागडे (वय ५०) या दुकलीला ठाणे गुन्हे शाखेने दिनांक २६ रोजी मोठ्या शिताफीने अटक केली असून त्यांच्याकडून पोलिसांनी ३० लाख ९१ हजार किमतीचा तब्बल १२३ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. या दोघा आरोपींना येत्या २८ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी मिळाली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

नाशिक मुंबई महामार्गावरील कळव्याच्या खरीगाव टोलनाक्याजवळून एका कारमधून गांजाची तस्करी होणार असल्याची प्राथमिक माहिती ठाणे गुन्हे शाखा घटक १ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन गायकवाड यांना मिळाली होती. या मिळालेल्या माहितीनुसार ठाणे पोलिसांनी योग्य सापळा रचुन सदर कारवाई केली.



या कारवाई दरम्यान पोलिसांनी संशयित कार अडवून तपासणी केली असता कारमध्ये प्लास्टिकच्या गोनीत ठेवलेल्या १२३.६४० किलो वजनाचा गांजा आढळून आला. या गांजाची बाजारातील किंमत सुमारे ३० लाख ९१ हजार रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# बल्लारपूर येथे टिंबर म्युझियम व झायलरियम उभारणार

▶ आ. मुनगंटीवार यांच्या मागणीला वनमंत्र्यांचे ठाम आश्वासन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेतील अर्धा तास चर्चेतून बल्लारपूर शहरात टिंबर म्युझियम व झायलरियम उभारण्यासाठी आग्रही मागणी केली. महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर असलेल्या आणि विपुल वनसंपदेमुळे जागतिक स्तरावर ओळख निर्माण केलेल्या बल्लारपूर शहरात १५० कोटींचे टिंबर म्युझियम व झायलरियम उभारण्याची गरज आ. मुनगंटीवार यांनी अधोरेखित केली आणि सभागृहात मागणी लावून धरली. यानंतर हा प्रकल्प नक्कीच साकारला जाईल, येत्या अर्थसंकल्पात ही मागणी पूर्ण होईल, अशी स्पष्ट आणि सकारात्मक घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी केली. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी अर्धा तास चर्चे द्वारे बल्लारपूरच्या सागवान लाकडाचा ऐतिहासिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय महत्त्वाचा मुद्दा प्रभावीपणे मांडत ही मागणी लावून धरली होती.



आ. मुनगंटीवार यांनी आपल्या भाषणात बल्लारपूरच्या सागवान लाकडाचा उपयोग अयोध्येतील श्रीराम मंदिर, संसद भवन, भारत मंडपम तसेच पंतप्रधानांच्या कार्यालयातील फर्निचरमध्ये झाल्याचे नमूद करत महाराष्ट्राचा अभिमान अधोरेखित केला. तसेच जगातील प्रगत देशांमध्ये लाकूड संशोधन संस्थांची उभारणी झाल्याचे उदाहरण देत, बल्लारपूर येथेही अशाच दर्जाचे ज्ञानकेंद्र उभारण्याची गरज त्यांनी मांडली. या प्रस्तावित प्रकल्पासाठी बल्लारपूर येथे सुमारे ६५ हेक्टर जागा उपलब्ध असून, 'राम-लक्ष्मण' नावाने ओळखले जाणारे ऐतिहासिक लाकूड, भामरागड परिसरातील जीवाश्म, लाकडाच्या ३२ दुर्मिळ प्रजाती, तसेच वनसंवर्धन, हवामान बदल आणि पर्यावरण शिक्षण यासंदर्भातील माहितीचे जतन, या म्युझियममध्ये करण्यात येईल. बल्लारपूर येथे उभारण्यात येणाऱ्या टिंबर म्युझियम व झायलरियममुळे या परिसराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाला नवी ओळख मिळणार आहे. सागवान परंपरेचा ठेवा, राम-लक्ष्मण लाकूड, ऐतिहासिक संदर्भांचे जतन आणि वैज्ञानिक पद्धतीने मांडणी, यामुळे हे ठिकाण अभ्यासक, विद्यार्थी आणि पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनेल.

# रवींद्रशेठ राजदेव यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन

## खासदार निलेश लंके यांची प्रमुख उपस्थिती

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर):** आज शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा नांदूर पठारचे माजी सरपंच रविंद्र राजाराम राजदेव यांच्या वाढदिवसानिमित्त एक भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत सकाळी ९ वाजता पार पडणार असून, निलेश लंके प्रतिष्ठान आणि रविंद्र राजदेव यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जाणार आहे. समाजातील गरजू घटकांना थेट लाभ देणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांचा यात समावेश आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिराने होईल. याच वेळी आरोग्य शिबिर, मोफत डोळे तपासणी आणि चष्मे वाटप, रेशनकार्ड वाटप, बांधकाम कामगार कार्ड वाटप तसेच बांधकाम कामगारांसाठी भांडी वाटप असे विविध शिबिरे भरविण्यात येणार आहेत. या माध्यमातून ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासह आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. दुपारी १ वाजता स्वप्नवेध अनाथालय, मंगरूळ येथे विद्यार्थ्यांसाठी भोजन आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर टाकळी ढोकेश्वर येथे अपंग आणि मुख-बधिर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात येईल. संध्याकाळी ७ वाजता खेळ पैठणीचा कार्यक्रम राणीताई लंके यांच्या उपस्थितीत होईल. तसेच या ठिकाणी गाडी घुंगराची फेम विलासराव अटक हेदेखील उपस्थित राहणार आहेत.

यानंतर अभिष्टचिंतन सोहळा आणि भोजन सभारंभाने कार्यक्रमाची सांगता होईल. रविंद्र राजदेव हे पारनेर तालुक्यातील सामाजिक कार्यासाठी ओळखले जाणारे नेते असून, ते निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली ते नियमितपणे आरोग्य, शिक्षण आणि शासकीय योजनांशी संबंधित उपक्रम राबवितात. हा वाढदिवस सोहळा केवळ व्यक्तिगत साजरा नसून, समाजसेवेच्या माध्यमातून लोकाभिमुख कार्य करण्याचा संकल्प आहे. या कार्यक्रमामुळे स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# देवखेळ वेबसिरीजचे आक्षेपाहार्य चित्रणाला कात्री

## झी ५ चे आश्वासन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, मुंबई :** ऐन शिमगोत्सवात झी ५ मराठी ओटीटीवर प्रसारित झालेली देवखेळ वेबसिरीज मधून कोकणातील लोकसंस्कृतीचे विद्रुपीकरण व कोकणातील प्रामुख्याने गुहागर मध्ये जोपासलेली नमन-देवखेळे परंपरेतील अवघ्यांचे श्रद्धास्थान संकासूर दैवताला क्रूर, खुनी असल्याचे चित्रण प्रसारीत झाल्याने मोठया प्रमाणात जनभावना दुखावल्या आहेत. सदर बाबत संतापजनक परिस्थिती निर्माण असून देवखेळ वेबसिरीजचा सर्वत्र निषेध नोंदवला जात आहे.सदर बाबत नमन लोककला संस्था तालुका गुहागर शाखेच्या वतीने ठोस पावले उचलत स्थानिक प्रशासन ते लोकप्रतिनिधी तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडे देवखेळ वेबसिरीज वर तातडीने बंदी आणण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. परंतु नमन मंडळ, देवखेळे व स्थानिक जनतेच्या निषेधाची तीव्रता लक्षात घेत नमन लोककला संस्था तालुका गुहागर शाखेच्या कार्यकारणीने मुंबईतील झी ५ कार्यालयामध्ये जाऊन प्रोग्रामिंग टीमचे हेड अजिंक्य गोखले यांची भेट घेऊन देवखेळ वेबसिरीज तातडीने बंद करण्याचे निवेदन देत गुहागरमधील तीव्र निषेधाची व संतापजनक परिस्थितीची निवेदनाद्वारे जाणीव करुन देण्यात आली आहे.



यावर नमन लोककला संस्था तालुका गुहागर कार्यकारणीने झी ५ चे संबधित व्यवस्थापन व देवखेळ वेबसिरीजचे लेखक, दिग्दर्शक त्यांच्या संबधितांबरोबर आम्हा न.लो. संस्था तालुका शाखा कार्यकारणी व नमन लोककलेतील जाणकर मंडळी, अभ्यासक असे आमच्या शिष्ट मंडळाबरोबर तातडीने मिटिंगचे आयोजन करण्याचे बजावले असून त्यास झी ५ चे प्रतिनिधी अजिंक्य गोखले यांनी होकार दर्शवला असून याबाबत लवकरच न. लो. संस्था संलग्न गुहागर शाखा कार्यकारणीच्या वतीने झी ५ कार्यालयाकडे मिटींगची तारीख कळविण्यात येणार असल्याचे न. लो. संस्था तालुका गुहागर शाखेच्या वतीने झी ५ ला सांगण्यात आले आहे,

झी ५ चे प्रतिनिधी अजिंक्य गोखले यांनी सदर मागणीला सहमती दर्शवली आहे. सदर महत्वपूर्ण भेटीला न. लो. संस्था तालुका गुहागर शाखेचे सचिव संदिप कानसे, खजिनदार/प्रसिद्धी प्रमुख उदय दणदणे, सदस्य दिपक वेलुंडे अमित काताळे आदी पदाधिकरी उपस्थित होते.

**यावर खुलासा करताना झी ५ प्रोग्रामिंग टीमचे हेड अजिंक्य गोखले यांनी सांगितले की, सदर वेबसिरीजचे फक्त सातच भाग प्रसारित होणार असून सद्यस्थितीत संकासुर निषेधाचा गुहागर वासियांचा रोष पाहता व निषेधप्रती निवेदनांवर झी ५ ने आलेल्या सूचनांची तात्काळ दखल घेऊन त्यात योग्य ते बदल केल्याचा दावा बोलून दाखविला. तसेच एपिसोड वाईज घेण्यात आलेल्या हरकती बाबतचे अस्वीकरण वेबसिरीजच्या प्रत्येक भागात सोडण्यात आल्याचे कळविले. तसेच अजूनही काही आक्षेपाहार्य आढळल्यास त्याचेही निराकारण करण्याचे आश्वासन दिले.**